# सामान्यरुप

## सामान्यरुप:

- विभक्ती प्रत्यय लागण्यापूर्वी किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी मूळ शब्दाच्या रूपात होणारा बदल.
  *उदा- मुल-मुलाला (मूळ शब्द 'मुल' या शब्दाला 'ला' हा प्रत्यय लागणापूर्वी त्याचे 'मुला' हे जे रूप होते त्याला सामान्यरूप म्हणतात.)*
  **हा बदल शब्दाच्या शेवटच्या अक्षरातील स्वरात होतो.**

## सामान्यरुपच का म्हणतात:

- कारण विभक्ती प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाचे बदलणारे रूप **सर्व विभक्तीत सारखेच म्हणजे सर्वसामान्य** असते.
  *उदा- तळे- तळ्यास, तळ्याशी, तळ्याचा, तळ्यात*

## अनेकवचनी शब्दांच्या बाबतीत सामान्यरुप:

- **अनेकवचनी शब्दांच्या** सामान्यरूपावर **नेहमी अनुस्वार** येतो.
  *उदा- मुलींनी, शहरांच्या, खिडक्यांचा.*

## सामान्यरुप कधी होते?

1) **विभक्तिप्रत्यय** लागण्यापूर्वी
2) **शब्दयोगी अव्यय** लागण्यापूर्वी

उदा- घर- घराजवळ, तळे- तळ्यामध्ये, घोडा- घोड्यासाठी

## दंततालव्यांचे सामान्यरुप:

- सामान्यरूप करताना **दंततालव्य वर्णाचा तालव्य वर्ण** होतो.
  *उदा.- चमचा- चमच्याने, चोच-चोचीने, राजा-राजाने*

## स-काराचे सामान्यरुप:

- सामान्यरूप करताना **स-काराचा श-कार** होतो.
  *उदा. मासा- माशाने पुल्लिंगी*

## सामान्यरुपाचे विविध प्रकार

***पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप:* (Trick- नातवाने धोब्याच्या घोड्याला किलोचा खांबा दिला.)**

| क्रं | मूळ शब्द | सामान्यरूप | नियम | उदाहरणे | अपवाद |
|---|---|---|---|---|---|
| १ | नातू | नातवा-ने | ऊ- वा | भाऊ-भावाने, विंचू-विंचवाने, लाडू-लाडवाचा | पेरू,चाकू,खडू,शत्रू,खेळाडू,पशु,गुरु, साधू |
| २ | धोबी | धोब्या-च्या | ई- या | तेली-तेल्याने, माळी- माळ्याचा | हत्ती, नंदी ,कवी,मुनी, ऋषी,कोबी |
| ३ | घोडा | घोड्या-ला | आ-या | कोयता- कोयत्याने, दोरा-ऱ्याचा | आजोबा,दादा,काका,मामा, नाना,चहा |
| ४ | किलो | किलो-चा | ओ- ओ | धनको- धनकोस, ऋणको - ऋणकोस | - |
| ५ | खांब | खांबा | अ- आ | निर्णय- निर्णयास, काळ-काळाने, वर्ग-वर्गात | - |

## स्त्रीलिंगी नामांचे सामान्यरुप

- *Trick- एकवचन- शाळेच्या भिंतीच्या विटेला जावेने व बायकोने नदीत फेकले.*
- *अनेकवचन- शाळांच्या भिंतींच्या विटांना जावानी व बायकांनी नद्यांत फेकले.*

| क्रं | मूळ शब्द | सामान्यरूप | नियम- एकवचन | नियम- अनेकवचन | उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शाळा | शाळे-च्या / शाळां-च्या | आ-ए | फक्त अनुस्वार | भाषा-भाषेचा-भाषांचा<br>माता- मातेला-मातांचा |
| 2 | भिंत | भिंती-च्या / भिंतीं-ना | अ-ई तर कधी अ- ए | अ-ई तर कधी अ- आ | विहीर-विहिरीत-विहिरींमध्ये |
| | वीट | विटे-ला/ विटां-ना | | | जीभ- जिभेला- जिभांनी |
| 3 | जाऊ | जावे-ने/ जावा-नी | ऊ-ए | ऊ-वा | पिसू-पिसवेला- पिसवांना |
| 4 | बायको | बायको-ने/ बायकां-नी | ओ-ओ (तेच राहते) | ओ-आ | |
| 5 | नदी | नदी-त/नद्यां-त | ई – ई | ई -या | बी-बिचा- बियांचा |

## नपुसंकलिंगी नामांचे सामान्यरुप

- *Trick - मुलाने कुंकवाने माखलेल्या लिंबाला तळ्यातील पाण्यात फेकले.*

| क्रं | मूळ शब्द | सामान्यरूप | नियम | उदाहरणे |
|---|---|---|---|---|
| 1 | मूल | मुला-ने | अ- आ | पाखरू- पाखराने, दुकान-दुकानात, पान-पानात |
| 2 | कुंकू | कुंकवा-ने | ऊ - वा | आसू-आसवाने , गळू-गळवाचा |
| | लिंबू | लिंबा-ला | ऊ- आ | लेकरू-लेकराने, कोकरू- कोकराने |
| 3 | तळे | तळ्या-तील | ए - या | खोके- खोक्यात, केळे-केळ्यांची |
| 4 | पाणी | पाण्या-त | ई - या | लोणी- लोण्याचा, दही- दह्याचा |

## कुलनामांचे/ आडनांवाचे सामान्यरुप

- आडनांवाचे सामान्यरूप करताना ते <u>अनेकवचनी</u> मानले जाते.
- Trick- शिंदे फडणवीस राणा वाणी कडू (ए- या, अ- आ, आ, ई, ऊ- बदलत नाही)

| क्रं | मूळ शब्द | सामान्यरूप | नियम |
|---|---|---|---|
| 1 | शिंदे | शिंद्यांना | ए- या |
| 2 | फडणवीस | फडणवीसांना | अ- आ |
| 3 | राणा | राणानां | आ-आ -बदलत नाही |
| 4 | वाणी | वाणींना | ई-ई -बदलत नाही |
| 5 | कडू | कडूंना | ऊ -ऊ -बदलत नाही |

## ग्रामनामांचे सामान्यरुप

*सामान्यरूप **केव्हा केव्हा होते** तर केव्हा केव्हा होत नाही.*

***Trick - सातारा पुणे मुंबई नागपूर (क्रमाने)***

| क्रं | मूळ शब्द | सामान्यरूप | नियम |
|---|---|---|---|
| 1. | सातारा | साताऱ्याला | आ-या |
| 2. | पुणे | पुण्याला | ए - या |
| 3. | मुंबई | मुंबईला | ई- ई (तीच राहतात) |
| 4. | नागपूर | नागपूरला/नागपुरात | अ –अ ( सप्तमीचा "त" लागताना आ- करांत) |

## विशेषणांचे सामान्यरुप

1) अ,ई ,ऊ - कारांत विशेषणाचे सामान्यरूप होत नाही. ( गरीब माणूस, कडू कारले, लोकरी कापड )
2) विभक्तिप्रत्यय लागलेल्या नामांच्या आकारांत विशेषणांचे सामान्यरूप - याकारांत होते. (आयोग)
   *भला माणूस -- भल्या माणसाला -*
   *- जेव्हा नामाला विभक्तीप्रत्यय लागतो तेव्हा आकारांत विशेषण हे याकारांत होते. (भला- भल्या)*

## सामान्यरुप केव्हा होत नाही ?

1) **एकाक्षरी शब्दाचे होत नाही.** उदा. 'ब' ने 'क' ला मारले.
2) **परकीय भाषेतील शब्दांचे केव्हा केव्हा होत नाही. ( केव्हा केव्हा होतेही – ऑफिस-ऑफिसात, बँक-बँकेत)**
   *उदा. पर्समध्ये दागिने आहेत.*
3) **व्यक्तींच्या विशेषनामांचे सामान्यरूप करत नाही.** उदा. अनिकेतने , अतुलला इ.
   *(**अपवाद :** ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तींच्या नामांचा उल्लेख करताना -उदा. रावणाने , बाजीरावाने)*

| क्रं | सामान्यरूप कोणाचे होत नाही ? | | उदाहरणे |
|---|---|---|---|
| 1 | एकाक्षरी शब्दाचे | | 'ब' ने 'क' ला मारले. |
| 2 | व्यक्तींच्या विशेषनामांचे | | अनिकेतने , अतुलला |
| 3 | पुल्लिंगी | ओ-करांत | किलो-किलोस |
| 4 | स्त्रीलिंगी | ओ-करांत (एकवचनात) | बायको-बायकोला |
| | | ई- करांत (एकवचनात) | नदी- नदीत |
| 5 | आडनावे | आ, ई, ऊ | राणा,वाणी, कडू |
| 6 | ग्रामनामे | ई | मुंबई-मुंबईला |
| 7 | विशेषणे | अ , ई, ऊ | गरीब, लोकरी, कडू |

# आयोगाने विचारलेले महत्वाचे प्रश्न

1. **खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या नामांचे व विशेषणांचे सहसा सामान्यरूप होताना मूळ रूपात बदल होत नाहीत? (R. M. Jan. 2023)**

(अ) ईकारान्त कुलनामांचे

(ब) अकारान्त, ईकारान्त, उकारान्त विशेषणे

(क) आकारान्त विशेषणे

(1) (अ) व (ब) बरोबर (2) (ब) व (क) बरोबर

(3) फक्त (अ) बरोबर (4) फक्त (क) बरोबर

2. **सामान्यरूप होताना पुढीलपैकी कोणत्या शब्दाच्या रुपात विकृती होते ?**

(Combine-B-Mains Sept. 2022)

(1) लिंबू (2) कवी

(3) दासी (4) चाकू

3. **ईकारान्त स्त्रीलिंगी ग्रामनामांचे सामान्यरूप कसे होते ? (R. M.- May 2022)**

(1) आकारान्त किंवा उकारान्त

(2) याकारान्त किंवा ओकारान्त

(3) वाकारान्त

(4) यापैकी नाही

4. **एखाद्या शब्दाचे आकारान्त सामान्यरूप होत असेल तर- (राज्यसेवा मुख्य 2019)**

(1) तो शब्द पुल्लिंगी आकारान्तच असला पाहिजे

(2) तो शब्द स्त्रीलिंगी एकारान्तच असला पाहिजे

(3) तो शब्द नपुंसकलिंगी ईकारान्तच असला पाहिजे.

(4) तो शब्द कोणत्याही लिंगाचा असला तरी आकारान्तच पाहिजे.

5. **पुढीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ? (Combine-C (main) 2018**

(अ) नामास विभक्ती प्रत्यय लागला की सर्वच विशेषणाचे सामान्यरूप या-कारान्त होते.

(ब) ऊ-कारान्त विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.

(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ब बरोबर

(3) अ व ब दोन्ही बरोबर (4) अ व ब दोन्ही चूक

6. **'आ-कारांत' पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप 'या-कारांत' होते. नियमाला ____ हा शब्द अपवाद आहे. (Combine-B Aug. 2018)**

(1) दादा (2) घोडा

(3) नाना (4) मामा

7. **खालील वाक्ये वाचून योग्य पर्याय निवडा. (Agri-May. 2018)**

अ) अ-कारांत विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.

(ब) विभक्ती प्रत्यय लागलेल्या नामांच्या आकारांत विशेषणाचे सामान्यरूप याकारांत होते.

1) फक्त अ बरोबर 2) फक्त ब बरोबर

3) अ, ब बरोबर 4) अ, ब चूक

8. **खालील वाक्ये वाचून योग्य पर्याय निवडा. (राज्यसेवा मुख्य - 2017)**

(a) एकाक्षरी शब्दाचे सामान्यरुप होत नाही.

(b) परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरुप केव्हा केव्हा होत नाही.

(c) ग्राम किंवा देशवाचक विशेषनामाचे केव्हा केव्हा सामान्यरुप होत नाही.

(1) फक्त (a) व (b) बरोबर

(2) फक्त (b) व (c) बरोबर आहेत.

(3) (a), (b), (c) बरोबर आहेत.

(4) (a), (b) चूक व (c) बरोबर आहे.

**9. पुढील विधाने वाचा व योग्य उत्तर लिहा. (राज्यसेवा मुख्य 2016)**

(a) अकारान्त, ईकारान्त व ऊकारान्त विशेषणांचे सामान्यरुप होत नाही.

(b) ई-कारान्त नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरुप आकारान्त होते.

(c) अकारान्त पुल्लिंगी नामांचे सामान्यरुप ई-कारान्त होते.

(1) फक्त (a) चूक (2) फक्त (b) व (c) चूक

(3) फक्त (a) व (b) बरोबर (4) फक्त (a) व (b) चूक

**10. पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचे असलेले 'विशेषणाचे सामान्यरुप' होणारे विशेषण कोणते आहे ?(dSTI 2016)**

(1) गरीब (2) भला

(3) लोकरी (4) कडू

**11. खालीलपैकी अचूक विधाने कोणती ? (STI मुख्य 2016)**

अ) एकाक्षरी शब्दाचे सामान्यरुप होत नाही.

ब) परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरुप होत नाही.

(1) अ बरोबर ब चूक (2) अ चूक, ब बरोबर

(3) दोन्ही चूक (4) दोन्ही बरोबर

**12. नाम, सर्वनाम किंवा तत्सम शब्द यांना विभक्तीप्रत्यय लागण्यापूर्वी मूळ रुपात जो बदल होतो त्याला काय म्हणतात. (कृषी सेवा 2012)**

(1) सरळरुप (2) सामान्यरुप

(3) अपूर्णरुप (4) पूर्णरुप

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 2 | 1 | 3 | 4 | 4 | 1 | 5 | 2 |
| 6 | # | 7 | 3 | 8 | 3 | 9 | 2 | 10 | 2 |
| 11 | 1 | 12 | 2 | | | | | | |